*निविदा मुल्य रुपये - १५,०००/-*

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

पोष्ट - शिर्डी -४२३१०९

ता.राहाता, जि. अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक - (०२४२३) २५८८५३, फॅक्स क्रमांक - २५८८७०

Website - www.sai.org.in, www.shrisaibabasansthan.org.in

# ***दुस-यांदा फेर ई- निविदा***

***श्री साईबाबा संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील मोतीचुर लाडु व बर्फी प्रसाद इ. उक्त्या मजुरी दराने बनवुन देणे विषयीची फेर ई-निविदा***

***सन - २०२३-२४***

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
पोस्ट- शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर, पीन कोड - ४२३१०९
*फोन नं. (०२४२३) २५८५०० / २५८८५३ फॅक्स नं. २५८८७०*
*(Website -www.shrisaibabasansthan.org, www.sai.org.in)*

## जाहीर दुस-यांदा फेर ई - निविदा

श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरिता सन २०२३-२४ करीता (**दि.०१ ऑक्टोबर, २०२३ ते दि.३० सप्टेंबर, २०२४)** या कालावधीसाठी मोतीचुर लाडु, व बर्फी प्रसाद उक्ते मजुरी दराने तयार करुन पॅकींग करुन देणे इ. कामांसाठी ऑनलाईन फेर ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | कामाचा तपशिल | निविदा कामाचे वार्षिक अंदाजे मुल्य रु. | ई-निविदा शुल्क रु. | बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | ५० ग्रॅम वजनाचे मोतीचूर लाडू तयार करुन मागणीप्रमाणे पाकीटे पॅकींग करुन देणे (उदा.०१ नगाचे, ०३ नगाचे व इतर) | **१.३० कोटी** | **रु.१५,०००/-** | **रु.२,००,०००/-** |
| २ | बर्फी प्रसाद तयार करुन देणे. | | | |

१. निविदेबाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
२. निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन भरावी.
३. यशस्वी निविदाधारकास कामाचे एकुण मुल्याच्या **३%** इतकी रक्कम संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणुन बिनव्याजी जमा करावी लागेल.
४. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी **दि.१५/०६/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.०३/०७/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** उपलब्ध राहतील.
५. ई-निविदेतील तांत्रिक कागदपत्रांच्या तपशीलप्रमाणे सर्व वैध कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.
६. ई-निविदा प्रक्रीयेमध्ये केवळ Online Submit केलेल्या कागदपत्रांचा विचार करणेत येईल. Hard Copy संस्थान प्रशासनाकडुन स्विकारली जाणार नाही. तथापि, यशस्वी निविदाकाराला सदर वैध कागदपत्रांच्या मुळ प्रती ई-निविदेसह पुढील १५ दिवसांचे आत संस्थान प्रशासनाकडे सादर करावे लागतील.
७. तांत्रिक निविदा शक्य झाल्यास **दि.०५/०७/२०२३** रोजी उघडण्यात येतील.
८. कोणतीही निविदा अंशतः / पुर्णपणे स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

स्वाक्षरीत /- x x x
(राहुल जाधव),
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

*श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी*

**लाडु व बर्फी  प्रसाद निर्मिती विभाग**

पो.शिर्डी, तालुका - राहाता, जिल्हा- अहमदनगर, पिन - ४२३१०९

---

**<u>प्रस्तावना</u> -**

"श्रीं"चे दर्शन घेतल्यानंतर दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना साईबाबांचा प्रसाद घरी घेऊन जाता यावा, या सात्वीक उद्देशाने व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय, संस्थान अधिनियम २००४  व आय  एस ओ यांचे नियमावलीस अधिन राहुन संस्थानचे लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचुर बुंदीचे लाडु तयार करुन त्याचे लाडू प्रसाद वितरण काऊंटर्सवर ०३ नग लाडू पाकीटांची विक्री करणेत येत आहे. तसेच दि.२१/०५/२०२२ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र.२१, निर्णय क्र.३९७ अन्वये, दि.१७/०८/२०२२ रोजीपासुन ०१ नग मोतीचुर लाडु पाकीटांची विक्री करणेस सुरुवात करण्यात आलेली आहे व दि.२१/०५/२०२२ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र.०६, निर्णय क्र.३११ अन्वये, श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना ०४ नग मोतीचुर लाडु प्रसादाचे (अंदाजे एकुण वजन २०० ग्रॅम) स्वतंत्र अशा आकर्षक रंगीत पुठ्ठा बॉक्समध्ये पॅकींग करुन उपलब्ध करुन देणेसाठी मान्यता देणेत आलेली असुन त्याकामी प्रथमतः प्रायोगिक तत्वावर ९८५० नग बॉक्सची खरेदी करण्यात आलेले आहेत.

श्रींचे दर्शन घेतल्यानंतर दर्शन रांगेत भक्तांना ५० ग्रॅम वजनाचे बुंदी प्रसाद पाकीटाचे निशुल्क वाटप करण्यात येत होते. तथापि, कोरोना रोगाचे वाढत्या प्राद्रुर्भावामुळे लॉकडाऊनमध्ये मा.महाराष्ट्र शासन व संस्थान प्रशासनाकडुन बुंदी वाटप बंद करण्यात आले होते. आता दि.२२/०३/२०२३ रोजीचे मा.तदर्थ समिती सभेतील निर्णय क्र.२७० व दि.१२/०४/२०२३ मा.तदर्थ समिती सभेतील विषय क्र.२७ निर्णय क्र.२९७ अन्वये, मान्यता देणेत आली असुन, दर्शन रांगेतील प्रत्येक साईभक्तांस ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट मोफत वाटपाची कार्यवाही श्री रामनवमी उत्सवाचे मुख्य दिवसापासुन सुरु करणेत आलेली आहे.

तसेच श्रीसाई प्रसादालयातील भोजनामध्ये भक्तांना मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी (रवा + बेसन) प्रसादालयाचे दैनंदिन मागणीनुसार तयार करुन देण्यात येत आहे. मोतीचुर बुंदी लाडू, व बर्फी प्रसाद तयार करण्याचे काम लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत बाहस्त्रोत ठेकेदाराकडुन उक्त्या मजुरी दराने करुन घेणेत येत असुन, मोतीचुर बुंदी लाडू प्रसादाची संस्थानचे कायम व कंत्राटी कामगारामार्फत विविध ठिकाणी काऊंटरवर विक्री करणेत येत आहे.

## <u>कामाचे स्वरुप</u>

श्री साईबाबा संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील उक्त्या मजुरी दराने करावयाच्या कामांचे स्वरुप खालीलप्रमाणे - (कामाचा कालावधी दि.०१ ऑक्टोंबर, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२४ अखेर)

**अ)** ५० ग्रॅम वजनाचे मोतीचुर बुंदी लाडु तयार करणे व पाकीटांवर पॅकींग तारखेचे शिक्के मारुन संस्थानचे मागणीप्रमाणे पाकीटे /बॉक्स् पॅकींग करुन देणे, (उदा.०१ नगाचे, ०३ नगाचे व इतर पॅकींग)

**ब)** भोजनामध्ये मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी तयार करुन देणे.

उपरोक्त कामांव्यतिरिक्त संस्थानमार्फत साज-या होणा-या सर्व उत्सवातील (श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा दसरा, दिपावली, नाताळ तसेच नववर्ष) श्री साईप्रसादालयातील भोजनाचे मिष्ठान्नाचे पदार्थ, चिवडा व बुंदी इ. कंत्राटदारास त्यांचे कर्मचा-यांमार्फत <u>विनामुल्य </u>बनवुन द्यावे लागतील, त्यासाठी आवश्यक असणारे साहित्य श्री साई प्रसादालय विभागाकडुन पुरविले जाईल. त्याबदल्यात कर्मचा-यांना दैनंदिन एक वेळ भोजन व चहा संस्थानतर्फे विनामुल्य दिला जाईल. मात्र कंत्राटदाराकडील कंत्राटी कर्मचा-यांची निवासव्यवस्था कंत्राटदारास स्वखर्चाने करावी लागेल.

❖ **<u>कामाचे स्वरुपानुसार मोतीचुर लाडु व बर्फी प्रसाद तयार करणा-या ठेकेदार व त्यांचेकडे कामास असलेल्या कर्मचा-यांनी पाळावयाचे नियम</u> -**

१) मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी तयार करणेकामी आवश्यक कच्चा माल (उदा. बेसन, साखर, गाईचे शुध्द तूप (गावरान), काजू, खिसमिस, हिरवी विलायची, दुध, पेपर पिशवी, पुठ्ठा बॉक्स, इंधन व पाणी इ.) लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन पुरविण्यात येईल. तथापि, कच्च्या मालाची वाहतूक ठेकेदाराने स्वत:चे कामगारांकडुन संस्थान वाहनाने संस्थानचे मुख्य भांडार / उपभांडारमधून करुन घ्यावी लागेल.

२) कंत्राटदार व त्यांचेमार्फत काम करु इच्छिणारे कंत्राटी कर्मचारी भाविक वृत्तीचे असावेत. उध्दट, बेशिस्त वर्तन, गैरशिस्त वर्तन करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना तात्काळ विनानोटीस व विना नुकसान भरपाई कामावरुन बंद करणेची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. उध्दट, बेशिस्त वर्तन, गैरशिस्त वर्तन असे प्रकार वारंवार घडत असल्यास विना नोटीस संबंधित कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनास राहील.

३) कंत्राटदारास देण्यात येणा-या कच्च्या मालापैकी हरबरा दाळ बेसन आटा तयार झालेनंतर चाळण काढणे व हरबरा दाळ सुकविणे इ. कामांसाठी संस्थान कर्मचारी सांगतील त्याप्रमाणे दैनंदिन आवश्यक्तेनुसार स्त्री / पुरुष कर्मचारी पुरवावे लागतील.

४) बेसनपीठ भिजवतांना स्वच्छ पाणी वापरण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील, त्यासाठी नळी / बादलीचा वापर करणे कंत्राटदाराचे कर्मचा-यांवर बंधनकारक राहील.

५) संस्थानकडुन वेळोवेळी होणा-या रेसीपीजच्या बदलांनुसार ठेकेदारांस मोतीचुर लाडु तयार करुन पाकीटांवर / पुठ्ठा बॉक्सवर पॅकींग तारीख व किंमत इ.ची शिक्के मारुन पॅकींग करुन द्यावी लागतील. त्यासाठी वेगळा दर मागता येणार नाही / दिला जाणार नाही.

६) मोतीचुर बुंदी लाडु तयार करणेकामी वापरण्यात येणारा साखरेचा पाक तयार करणे व चाचणी घेणे इ.साठी अनुभवी (राजस्थानी) आचा-यांची नेमणुक करणे कंत्राटदारांस बंधनकारक राहील. तसेच हवामानाच्या बदलानुसार चाचणीत बदल करणे आवश्यक राहील. तसेच कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांवर नियंत्रण व देखरेख ठेवणेची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील.

७) साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणात मोतीचुर लाडू प्रसादाचे मागणीप्रमाणे दररोज सरासरी ५० ते ६० हजार पाकीटे व गर्दीचे काळात दैनंदिन ८० ते ९० हजारापर्यंत लाडू प्रसाद पाकिटे तारखेची शिक्के मारुन पॅकींग करुन द्यावे लागतील तसेच मान्यवर साईभक्तांना विक्रीसाठी विभागाचे दैनंदिन मागणीनुसार पाकीटे /बॉक्स पॅकींग करुन तारखेची शिक्के मारुन द्यावी लागतील.

८) लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागास दैंनदिन ४५ क्विंटलचा लाडु प्रसादाची आवश्यकता असल्याने त्यासाठी आवश्यक कर्मचा-यांची नेमणुक करावी व त्याबाबत वैध लेबर लायसन्सची प्रत निविदा मंजुर झालेनंतर ०१ महिन्यांचे आत संस्थान प्रशासनास सादर करणे ठेकेदारास बंधकारक राहील.

९) संस्थानकडुन कंत्राटदारास कार्यारंभ आदेश मिळालेपासुन ०२ महिन्यांचे आत कंपनीने उत्तम दर्जाचे प्रशिक्षक नेमुन त्यांचेमार्फत लाडु तयार करणा-या कर्मचा-यांना प्रशिक्षण (Training) द्यावे लागेल. तसे न केल्यास प्रतीदिन रु.५००/- मात्रचा दंड कंत्राटदाराचे मासिक बिलातुन कपात / वसुल केला जाईल.

१०) गर्दीचे व उत्सव काळात मोतीचुर बुंदी लाडु व तयार करणे, पॅकींग करणे इ. कामांसाठी संस्थान प्रशासन व वरिष्ठांचे सुचनांनुसार अतिरिक्त कर्मचा-यांची नेमणुक करुन मागणीप्रमाणे आवश्यक मालाची पुर्तता करुन देणे ठेकेदारांस बंधनकारक राहील.

११) कर्मचा-यांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे (जसे - केस कापणे, दाढी, नखे, शारीरिक इजा / दुखापत, त्वचेचे आजार, स्वच्छ गणवेश इ.) लक्ष ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व त्यासाठी स्वतंत्र रजिस्टरमध्ये दैनंदिन नोंदी ठेवणे व विभागप्रमुख मागणी करतील त्यावेळी रजिस्टर सादर करणे बंधनकारक राहील.

१२) लाडु / बुंदी पॅकींग कक्षात कर्मचा-यांना वापरावयाचे चप्पल / गमबुट, अॅप्रॉन, टोपी, मास्क हातमोजे इ. कंत्राटदारांस स्व-खर्चाने पुरवावे लागतील व त्याचा वापर करुन घेणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१३) लाडु पॅकींग करणेसाठी अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे लाडु तयार करुन संस्थानचे मागणीप्रमाणे पॅकींग (पॅकींग तारखेच्या शिक्क्यासह) करुन द्यावी लागेल. पॅकींगसाठी वापरण्यात येणारी उपकरणे (**उदा.हिटींग पट्टया, तारखेची शिक्के, स्टॅम्प पॅड, शाई बॉटल व इतर साहित्य**) कंत्राटदारांना स्वत:ला आणावे लागतील.

१४) किचनमधील सर्व साफसफाई व स्वच्छतेची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराकडील कर्मचा-यांची राहील, याबाबत कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. किचनमध्ये अस्वच्छता आढळल्यास ठेकेदारास देय्य असलेल्या मासिक बिलाचे एकुण रकमेतुन २% दंडाची रक्कम ताबडतोब वसुल करणेत येईल.

१५) भविष्यात संस्थान प्रशासनाकडे लाडु तयार करण्याचे अथवा पॅकींग करण्याचे मशिन उपलब्ध झाल्यास मशिनव्दारे लाडु व बुंदी तयार करुन पॅकींग करणे कामाचे दर स्वतंत्ररित्या मागविणेत येतील.

१६) श्री साई प्रसादालयामधील भोजनात मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी रवा / बेसन बर्फी प्रसादालय विभागाचे मागणीनुसार व आवश्यकतेप्रमाणे तयार करुन द्यावी लागेल. बर्फी प्रसाद तयार करणेकामी आवश्यक कच्चा माल (उदा. साखर, तूप, रवा / बेसन, इंधन व पाणी इ.) श्री साई प्रसादालयाकडुन मागणीप्रमाणे पुरविण्यात येईल.

१७) उपरोक्त कामासाठी लावलेल्या कर्मचा-यांना एक वेळ भोजन व एक वेळ चहा संस्थानतर्फे विनामुल्य दिला जाईल. मात्र निवासव्यवस्था कंत्राटदारास स्वखर्चाने करावी लागेल, त्याबदल्यात श्रींचे सर्व उत्सव कालावधीत तयार करणेत येणारे मिष्ठान्न /पदार्थ कंत्राटदारांस **<u>विनामुल्य</u>** बनवुन द्यावे लागेल. सदरचे उत्सव कालावधीत केलेल्या कामाचा कोणताही अतिरिक्त मोबदला/ मानधन दिले जाणार नाही/ त्याची मागणी करता येणार नाही.

(राहुल जाधव),
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

❖ **<u>निविदेच्या अटी - शर्ती -</u>**

**I) <u>निविदा कालावधी, निविदा शुल्क, बयाना रक्कम, निविदेतील दर व करारनामा</u>**

१. सदर निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतीम दिनांकापासुन १२० दिवसांचा राहील.

२. मोतीचुर बुंदी लाडू तयार करुन पाकीटे / बॉक्स पॅकिंग करणे व बर्फी प्रसाद तयार करणे इ. कामांचा कालावधी कार्यादेश मिळालेपासुन ०१ वर्षासाठी राहील.

३. निविदेसोबत नियमाप्रमाणे बयाणा रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) व निविदा शुल्क रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर जमा करुन त्याची भरणा पावती सोबत ऑनलाईन जोडावी.

४. निविदा शुल्कासाठी भरलेली रक्कम रु.१५,०००/- परत केली जाणार नाही, त्याचप्रमाणे यशस्वी निविदाधारकाला कामाच्या एकुण मुल्याच्या ३<u>% इतकी अनामत रक्कम</u> निविदा स्विकृतीचे पत्र मिळालेपासुन १५ दिवसांचे आत संस्थान खाती किंवा लेखाशाखेत जमा करावी लागेल. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही, मागता येणार नाही. सुरक्षा अनामत रक्कम ही कंत्राट कालावधी पुर्ण केल्यानंतर परत केली जाईल.

५. ठेकेदाराने निविदा स्विकृतीचे पत्र दिल्यानंतर १ महिन्यांचे आत रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल व सदर प्रकरणी करावयाचा करारनामा नोंदणीकृत करणेसाठी येणारा खर्च कंत्राटदारास स्वतः करावा लागेल. सदर पुर्तता विहीत मुदतीत करारनामा न केल्यास त्यापुढील तारखेपासुन प्रतीदिनी रु.१,०००/- दंड मासिक बिलातुन कपात करणेत येईल.

६. कंत्राटदार / निविदाधारक यांची न्युनतम दरांची निविदा मंजुर झालेनंतर सदर कामाचा ठेका इतर उपकंत्रादारास देता येणार नाही / त्याची नेमणुक करता येणार नाही.

७. मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकिंग तारखेची शिक्के मारुन पॅकींग करुन देणेबाबतचा संपुर्ण तपशिल उपरोक्त प्रस्तावनेत दिलेला आहे, त्यानुसार सदर कामांसाठी उक्ते दर देतांना GST वगळुन द्यावेत. तसेच लागु असलेले कर (उदा. GST व इतर कर) स्वतंत्र दाखवावे.

८. निविदेसोबत जोडलेल्या **परिशिष्ट "ब"** (BOQ A & B) मध्ये दिलेल्या नमुन्यात दर नमुद करावेत. दर अंकी व अक्षरी सुस्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे, दर नमुद करतांना खाडाखोड करु नये. अंकी व अक्षरी दरांमध्ये तफावत आढळुन आल्यास कमी असलेले दर गृहीत धरण्यात येईल.

९. सदर उक्त्या मजुरी कामाच्या बीलांवरील सरकारमान्य GST संस्थान प्रशासनाकडुन ठेकेदारांस आदा केला जाईल. सदरचा कर (GST) ठेकेदाराने सरकारला भरुन त्याची चलने / पावती पुढील महिन्यांचे बिलासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

१०. निविदाधारकाने निविदा मंजुर झाल्यानंतर काही कारणास्तव कंत्राट घेण्यास नकार दिल्यास / टाळाटाळ केल्यास / हलगर्जीपणा केल्यास निविदेसाठी भरण्यात आलेली निविदेची बयाना (EMD) व सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाती जमा करुन घेणेत येईल व सदर ठेकेदारास काळया यादीत टाकण्याची कार्यवाही संस्थान प्रशासनाकडुन करण्यात येईल.

**II) <u>निविदेतील तांत्रीक कागदपत्रे</u> -**

११. अन्न औषध प्रशासनाचा चालू वर्षाचा केटरिंग परवाना, वैध लेबर लायसन्स, प्रा.फंड कोड नंबर, कर्मचारी राज्य विमा महामंडळ (Employees' State Insurance Corporation) यांचा ESIC कोड नंबर, पॅन कार्डची छायांकित प्रत, जी.एस.टी.नंबर व आयकर भरल्याची दस्ताऐवज इ. सर्व स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत सादर करावीत. पुर्वीचे निविदेसोबत दिलेली कागदपत्रे व बयाणा रक्कम विचारात घेतली जाणार नाही अथवा ग्राहय धरली जाणार नाही. निविदा सादर केल्यानंतर निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निविदेतुन माघार घेतल्यास संपुर्ण बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल, त्याची निविदाकारास मागणी करता येणार नाही.

१२. निविदेसोबत स्कॅन व प्रमाणीत करुन जोडलेली वैध कागदपत्रे विचारात घेतली जातील, वैधता संपलेल्या व निविदेसाठी संस्थानचे आवक विभागात प्राप्त झालेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

१३. निविदा ज्या फर्मच्या / व्यक्तीच्या नावाने असेल त्याच नावाने इतर सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भिन्नता/तफावत आढळुन आल्यास सदर निविदा अनाधिकृत समजून बाद ठरविण्यात येईल, त्याबद्दल निविदाधारकास तक्रार करण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

१४. निविदाधारकांने Technical Bid मधील कागदपत्रांसोबत त्यांना कुठल्याही संस्थान/शासकीय/ निमशासकीय / खाजगी संस्थेने काळया यादीत (Black List) समाविष्ठ केलेले नसलेबाबत रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवरील प्रतिज्ञापत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक राहील.

१५. संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मितीकरीता निविदा सादर करतांना निविदाधारकांची सन २०१९-२० व २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल किमान रु.६० लाख इतकी असलेबाबत सनदी लेखापाल यांनी प्रमाणीत केलेले प्रमाणपत्र (**परिशिष्ट "क"** प्रमाणे) सोबत जोडणे आवश्यक राहील.

### III) <u>किमान वेतन, कर्मचारी भविष्य निधी, ESIC योजना व विमा पॉलीसीबाबत</u>

१६. कंत्राटदारास त्यांचेकडील कुशल, अकुशल कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाचे **<u>शॉप अॅन्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०२ प्रमाणे</u>** अनुज्ञेय असणारे किमान वेतन दर, महाराष्ट्र शासनाकडुन वेळोवेळी देय्य होणारे स्पेशल अलौन्ससह अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेसह वेतन देणे बंधनकारक राहील किंवा किमान वेतन दरात वेळोवेळी होणा-या बदलांनुसार वेतन देणे बंधनकारक राहील. त्याबाबत संस्थानकडुन वाढीव मोबदला मागता येणार नाही.

१७. कंत्राटदारामार्फत नेमणुक करणेत आलेल्या कामगारांचे दैनंदिन आगमन-निर्गमनावर नियंत्रण ठेवणेसाठी स्वखर्चाने बायोमेट्रीक अॅटेडन्स सिस्टीम बसविणे व त्याचा कर्मचा-यांना वापर करावयास लावुन त्याचा अहवाल पुढील महिन्यांचे पगारपत्रकांसोबत सादर करणे कंत्राटदारवर बंधनकारक राहील.

१८. आपणास स्वत:चा भविष्य निर्वाह निधी व ESIC योजनेचा स्वतंत्र कोड क्रमांक असणे आवश्यक असुन, पुरावा म्हणून पी.एफ कोड ड्राप्ट लेटरची सत्यप्रत व ESIC कोड लेटरची सत्यप्रत निविदेसोबत जोडावी.

१९. कंत्राटदाराने कामास लावलेल्या सर्व कामगारांचे वेतन प्रत्येक महिन्याचे १० तारखेचे आत बॅक अकाऊंट पध्दतीने प्रत्येक कामगारांच्या बँक खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील, त्यासाठी कंत्राटदारास संस्थानकडुन बीलाची रक्कम आदा केली जाण्याची वाट पाहता येणार नाही. कंत्राटदाराने कामगारांचे वेतन १० तारखेपर्यंत न केल्यास त्यानंतरच्या विलंबासाठी म्हणजेच ११ तारखेपासुन प्रति कामगार प्रतिदिन किमान रुपये १०/- इतका दंड आकारला जाईल व दंडाची रक्कम पुढील महिन्यांचे देयकांमधुन वसुल केली जाईल.

२०. सदर कामासाठी लावण्यात येणा-या कंत्राटी कामगारांचे बाबतीत कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ (Workmen Compensation Act वर्कमॅन कॉम्पेन्सेशन अॅक्ट १९२३) नुसार कंत्राटी कामगारास नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास सदर नुकसान भरपाईची रक्कम भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२

(प्रॉव्हीडंट फंड ॲक्ट १९५२ नुसार भरावी लागणारी अंशदानाची रक्कम प्रशासकिय चार्जेससह तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावे लागणारे किमान वेतन दर तसेच पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९६९ नुसार कंत्राटी कामगारांना विहीत मुदतीत वेतन अदा करणे इ. बाबींची कायदेशीर जबाबदारी ही कंत्राटदारावर बंधनकारक राहील त्याची तोशिष संस्थानला लागता कामा नये.

२१. <u>कंत्राटदाराने कामास लावलेल्या सर्व कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीतील (PF) कर्मचारी हिस्सा १२% व मालकाचा हिस्सा १३% (प्रशासकीय चार्जेसह) अशा एकुण २५% भविष्य निर्वाह निधी रकमेचा विहीत मुदतीत शासनाकडे भरणा करुन, दरमहा वेतन बँकेत जमा केलेबाबतची बॅक यादीची पोहोच व भविष्य निर्वाह निधी (PF) व ESIC इ. ची रक्कम भरणा केलेच्या पावत्या / चलने संस्थान प्रशासन कार्यासन १०अ कडे सादर करावी लागेल, याबाबत संस्थानची दिशाभुल केल्यास कंत्राटदारास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याचे कार्यकंत्राट रद्द करुन व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून, कंत्राटदारास पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येईल.</u>

२२. कंत्राटदाराने त्यांचे कर्मचा-यांना वेतन आदा केलेबाबत सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेनंतर व तशी संस्थान प्रशासनाची खात्री झालेनंतरच पुढील ३० दिवसांचे आत केलेल्या कामाचे बील आदा करण्याचा संस्थान प्रशासनाचा प्रयत्न राहील.

२३. सदर कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारांचे ओळखपत्र, व्यवसाय कर, कामगार कल्याण निधी, आयकर, टी.डी.एस., इंक्रीमेंट, उपदानाची रक्कम, सानुग्रह अनुदान / बोनस (वेळोवेळी होणा-या बदलानुसार किंवा ८.३३% या दराने), Workmen Compensation Policy, पगारी रजा व सुट्टया घरभाडे भत्ता, कर्मचारी ESIC, जी.एस.टी व इतर आर्थीक बाबी इ. बाबत सर्व कायदेशीर पुर्तता औद्योगिक व कामगार कायद्याचे तरतुदीनुसार ०१ महिन्याचे आत करणेची जबाबदारी कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.४७/ विमा प्रशासन परिपत्रकानुसार सदर कामासाठी लावलेल्या कामगारांचा **<u>अपघाती विमा</u>** उतरविणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील व सदर विमा पॉलीसीची प्रत ०१ महिन्याचे आत संस्थान प्रशासनाकडे सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२५. **<u>कर्मचारी राज्य विमा महामंडळा</u>**चे (Employees' State Insurance Corporation) **<u>ESIC</u>** योजनेतील तरतुदीनुसार सर्व कामगारांचे रजिस्ट्रेशन करुन कंत्राटी कर्मचारी हिस्सा ०.७५% व मालकाचा हिस्सा ३.२५% कंत्राटदाराने स्वतः भरावयाचा आहे. व प्रत्येक महिन्यांचे रकमेचा भरणा करुन त्याची चलने / कागदपत्रे संस्थानच्या प्रशासन शाखा कार्यासन १०अ कडे पुढील महिन्यांचे बीलासोबत सादर करणेची जबाबदारी कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२६. सदर कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारांसंबंधी कंत्राटी कामगार नियम व निर्मुलन अधिनियम १९७० नुसार ठेवावे लागणारे हजेरी रजिस्टर, वेतन रजिस्टर व इतर संबंधीत सर्व रेकॉर्ड व दस्तऐवज विहीत नमुन्यात ठेवण्याची व त्यासंबंधी सर्व कायदेशीर पुर्तता करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२७. मासिक बिले सादर करतांना बिलात कार्यादेशातील वर्णनाप्रमाणेच संपुर्ण तपशिल असणे आवश्यक राहील, संक्षिप्त स्वरुपात असलेली बिले ग्राह्य धरली जाणार नाहीत / आदा केली जाणार नाहीत.

२८. कंत्राटदाराने त्यांचेमार्फत नेमलेले कर्मचारी हे भाविक प्रवृत्तीचे व तत्परतेने सेवा देणारे असावेत, उध्दट बेशिस्त वर्तन व गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचारी तात्काळ विनानोटीस कामावरुन बंद करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२९. कंत्राटदारामार्फत पुरविलेले कंत्राटी कामगारांनी कोणतेही गैरकृत्त वर्तन केल्यास, संस्थानचे मिळकतीस इजा/हानी पोहचविल्यास त्याबाबतची संपुर्ण नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

३०. सदर कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारांसंबंधी कंत्राटी कामगार नियम व निर्मुलन अधिनियम १९७० नुसार ठेवावे लागणारे कंत्राटी कामगारांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक व इतर आवश्यक ते रेकॉर्ड कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्टप्रमाणे कंत्राटदारास विहीत नमुन्यात ठेवावे लागतील. कंत्राटदार व कामगार यांचेमध्ये वेतनाबाबत काही वाद-विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

### IV) <u>अन्न सुरक्षा मानके कायदा- २००६ आणि नियम २०११ व ISO 22000-2005 चे नियम -</u>

३१. मा.अन्न सुरक्षा मानके प्राधिकरण, महाराष्ट्र शासन यांचे नियमामध्ये वेळोवेळी होणारे बदल (रुल्स ॲन्ड रेग्युलेशन) कंत्राटदारावर बंधनकारक राहतील व त्यांचे निर्देशाप्रमाणे कामगारांचे आरोग्य / स्वच्छता, कामाचे ठिकाणी धुम्रपान व मद्यपान इत्यादी करणेस सक्त मनाई आहे याची विशेष काळजी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे, तसे आढळुन आल्यास कंत्राटदारावर रु.५००/- प्रती कामगार याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

३२. सदरचे कामासाठी लावणेत येणा-या प्रत्येक कामगारांची वैदयकिय तपासणी दर ०३ महिन्यांनी संस्थानचे रुग्णालयात निशुल्क करण्यात येईल. यासाठी ठेकेदाराने संस्थानने ठरवून दिलेल्या वेळेत विभागप्रमुख यांचे पत्र घेऊन, प्रत्येक कर्मचा-यांची दर ०३ महिन्यांनी वैदयकिय तपासणी करुन, तपासणी अहवाल लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागास सादर करणेची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील. संसर्गजन्य आजार किंवा त्वचारोग झालेल्या कर्मचा-यांकडुन सदरची कामे करुन घेता येणार नाही.

३३. अन्न सुरक्षा मानके कायदा- २००६ आणि नियम २०११ व ISO22000-2005 चे नियमानुसार स्त्री कामगार यांना डयुटीचे वेळेत (गळयातील मंगळसुत्र वगळता) अंगठी, नेलपेंट, बांगडी, कानातील भुषणे तसेच पुरुष कामगारांना हातातील कडे, धागे, अंगठी इ. वस्तु वापरणेस प्रतिबंध राहील. पुरुष कामगारांना कामाचे ठिकाणी येतांना डोक्याची केस कापुन येणे, दाढी करणे, हाताची नखे कापणे इ. सर्व कर्मचा-यांवर बंधनकारक राहील. कामावर असलेल्या सर्व कर्मचा-यांची वैयक्तिक स्वच्छता ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३४. कंत्राटदारांकडील कंत्राटी कामगारांना गणवेश, ओळखपत्र, चप्पल/ गमबुट, ॲप्रॉन, टोपी, मास्क हातमोजे इ. कंत्राटदारांस स्व-खर्चाने पुरवावे लागतील व त्यांचा वापर करणेची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

### V) <u>कार्य कंत्राट रद्द करणे / काढुन टाकणे / दंड आकारणे इ. बाबत -</u>

३५. लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागप्रमुख अगर कार्यालयातील कर्मचारी यांचे सुचनेप्रमाणे मालाचे परिमाण वापरुन आवश्यकतेनुसार तयार करुन द्यावी लागेल. याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद उपस्थित होणार नाही, अशाप्रकारे आपलेकडील कर्मचा-यांचे वर्तन ठेवावे. वरिष्ठांसोबत उध्दटपणे, अर्वाच्य भाषेत बोलणे अगर मोठा वाद उद्भवल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदारास जबाबदार धरुन कंत्राट रद्द करणेचा अधिकार संस्थान प्रशासनास राहील.

३६. मोतीचुर लाडू बनविणे व पॅकींग करण्याचे काम गतीमान होणेसाठी स्वंयचलीत मशिनरी घेणे संस्थान प्रशासनाचे विचाराधीन आहे. मशिनरी खरेदी केल्यामुळे कंत्राटदाराचे काही प्रमाणात अथवा पुर्णत: काम बंद झाल्यास त्यास कंत्राटदाराला आक्षेप घेता येणार नाही. संस्थानकडे मशिनरी उपलब्ध झाल्यानंतर सध्याचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्यापुढील कालावधीसाठी नविन दर ठरविणेसाठी विहीत पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

३७. मोतीचुर लाडु व बर्फी प्रसाद बनविणेच्या कामात, गुणवत्तेस निविदाधारक अपयशी ठरले अथवा गर्दीच्या प्रमाणात पुरेसे मनुष्यबळ वापरुन मोतीचुर लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद पुरविण्यात असमर्थ ठरल्यास एकुण

मासीक कामाच्या बीलातुन ५% पर्यंत दंडाची रक्कम कपात केली जाईल. कपात केलेली दंडाची रक्कम परत मागण्याचा अधिकार कंत्राटदारास राहणार नाही. तसेच अशा स्वरुपाच्या तक्रारी वारंवार आल्यास कंत्राटदारास कोणतीही पुर्व सुचना न देता काळया यादीत (Black List) मध्ये समाविष्ट करणेत येऊन, संपुर्ण सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

३८. निविदेतील, करानाम्यातील व कार्यादेशातील सर्व अटी - शर्तीचे पालन करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. निविदेतील, करानाम्यातील व कार्यादेशातील एक किंवा अनेक अटी-शर्तीचे उल्लंघन झाल्यास, कंत्राटदाराचे कार्यकंत्राट रद्द करुन, संपुर्ण सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल व कंत्राटदारास पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत (Black List) समाविष्ट करणेची कार्यवाही संस्थान प्रशासनाकडुन करणेत येईल.

## VI) <u>लाडु प्रसादाची गुणवत्ता व सदरचे कामांसंबंधीत इतर अटी - शर्ती</u> -

३९. संस्थान प्रशासनाकडुन लाडु प्रसादाचे दर्जा व गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी वेळोवेळी बदल करणेत येणा-या रेसीपीजनुसार व संस्थानचे मागणीनुसार (उदा.०१ नगाचे, ०३ नगाचे व इतर पॅकींग) लाडुची पाकीटे / बॉक्स पॅकींग करुन द्यावी लागतील, त्यासाठी ठेकेदाराने निविदेत दिलेल्या न्युनतम दरांनुसार मजुरी बिल आदा करण्यात येईल. त्याव्यतिरिक्त कुठलीही दरवाढीची मागणी करता येणार नाही.

४०. निविदेतील मंजूर झालेल्या दराने व विभागाचे मागणीप्रमाणे मोतीचुर बुंदी लाडू, व बर्फी प्रसाद तयार करुन पाकीटे / बॉक्स पॅकींग तारखेच्या शिक्क्यांसह पुरवठा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. <u>लाडु पाकीटे व बॉक्सवर तारखेची शिक्के मारणेकामी लागणारी उपकरणे / साहित्य (उदा. तारीख व किंमतीचे शिक्के, स्टॅम्प पॅड व शाई बॉटल (निळा रंग) व इतर साहित्य) कंत्राटदारास स्वखर्चाने आणवे लागतील.</u> मंजूर दरांमध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही.

४१. कंत्राटदाराचे कामाची प्रत (गुणवत्ता) समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास किंवा मोतीचुर बुंदी लाडू व बर्फीचा पुरवठा संस्थानचे मागणीप्रमाणे न झाल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून इतर कंत्राटदाराकडून बाजारभावाने आवश्यक तेवढे मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी तयार करण्यात येऊन त्यासाठीच्या ज्यादा लागलेल्या फरकाची खर्ची झालेली रक्कम सुरक्षा अनामत रक्कमेतून किंवा पुढील देयकांमधुन प्रतिपुर्ती करण्यात येईल.

४२. मोतीचुर बुंदी लाडू प्रसाद तयार करुन पेपर पिशवी / बॉक्समध्ये मागणीप्रमाणे पॅकींग *(उदा.१५० ग्रॅम वजनाचे ०३ नगाचे लाडू पाकीट, ५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे पाकीट व आवश्यकतेप्रमाणे इतर पॅकींग)* करुन द्यावी लागेल.

४३. कोणत्याही प्रकारे पदार्थ खराब झाल्यास / नासधुस झाल्यास त्याची नुकसान भरपाई होणारी रक्कम कंत्राटदाराचे दरमहा देय असणा-या रकमेतुन / बीलातुन वसुल केली जाईल. त्यासाठी अनुभवी व तज्ञ (राजस्थानी आचारी) व्यक्तींची नेमणुक करणे कंत्राटदारावर बंधकारक राहील.

४४. सदर काम उक्त्या मजुरी पध्दतीचे असल्याने कंत्राटदारांकडून कामास लावणेत आलेले कामगार व त्यांचे सेवक संस्थान सेवेकरीता आग्रह धरु शकणार नाहीत / पात्र असणार नाहीत. तसेच कंत्राटदाराने लावलेल्या कामगारांचा संस्थानशी कोणत्याही प्रकारे मालक - नोकर असा कायदेशीर संबंध राहणार नाही. अथवा कंत्राटदार व त्यांचे कामगार यांच्यात काही वाद उपस्थित झाल्यास तो कंत्राटदाराने सोडवायचा आहे त्याची कोणतीही जबाबदारी संस्थानवर असणार नाही.

४५. कार्यकंत्राटाचा कालावधी संपलेनंतर पुढील कालावधीकरीता नविन ठेकेदाराची निवड करणेकामी / ई-निविदा प्रक्रीयेचे कार्यवाहीसाठी अवधी लागत असल्यास सदर कालावधीसाठी संस्थानने मुदतवाढ दिल्यास, आहे त्याच पुर्वीच्या मंजूर दराने नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपावेतो कंत्राटदारास काम करावे लागेल, याबाबत कोणतीही दरवाढ मागता येणार नाही.

४६. कंत्राटदारांस कोणत्याही कारणाकरीता आगाऊ (अॅडव्हान्स) रक्कमेची मागणी करता येणार नाही.

४७. निविदेमध्ये नमुद केलेले कामाचे अंदाजे किंमतीएवढे काम देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

४८. लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी लागणारे सर्व आवश्यक साहीत्य (उदा. कौचे, झारे, बुंदी काढणेसाठी पाट्या, स्टिल मग, बुंदी सुकविणेकामी व बर्फी बनवितांना ट्रे मधुन बर्फी खाली टाकणेकामी चांगल्या प्रतीचा प्लास्टीक कागद / ताडपत्री इ.) कंत्राटदाराने स्वखर्चाने आणून वापरावयाची आहेत. तसेच किचनमधुन तसेच उपभांडारमधुन माल ने-आण करणेसाठी लागणा-या हायड्रोलिक गाडया संस्थानकडून पुरविल्या जातील मात्र सदरच्या गाडया खराब झाल्यास / तुटल्यास / नादुरूस्त झाल्यास अगर नविन स्पेअर पार्ट बदलल्यास सदर स्पेअर पार्टची किंमत / नुकसान भरपाईची रक्कम ठेकेदाराचे देय्य होणा-या बिल रकमेतुन वसुल करणेत येईल.

४९. सदर कार्यकंत्राट / व्यवहाराबाबत काही वाद- विवाद उपस्थित झाल्यास, ज्यु.सिव्हील डिव्हीजन, राहाता / कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

५०. कोणतीही निविदा मंजूर अथवा सर्व निविदा नामंजूर करण्याचा / नाकरण्याचा हक्क श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबत कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

५१. उपरोक्त अटी-शर्तीत काही बदल सुधारणा करणे अथवा जादा अटी-शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकांच्या कोणत्याही अटी - शर्ती संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

(राहुल जाधव),
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

## <u>- निविदाधारकांसाठी सूचना-</u>

दिनांक -

**विषय-** **<u>श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता सन २०२३-२४ करीता दि.०१ ऑक्टोबर, २०२३ ते दि.३० सप्टेंबर, २०२४ या कालावधीकरीता उक्त्या मजुरी दराने मोतीचुर बुंदीचे लाडू, तयार करुन मागणीप्रमाणे पॅकींग करुन देणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणे इ. कामांची ई - निविदेबाबत सुचना...</u>**

वरील विषयाचे संदर्भातील ई - निविदा ऑनलाईन पध्दतीने मागविणेत येत आहेत, सदरची ऑनलाईन निविदा भरतांना निविदाधारकाने खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व अटीं-शर्ती पुर्ण वाचुनच निविदा भरावयाची आहे.
२. निविदाधारकाने निविदा शुल्क रुपये १५,०००/- व बयाणा रक्कम रु.२,००,०००/- शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन जमा करुन त्याची पोहोच पावती निविदेसोबत जोडावी.
३. यशस्वी निविदाधारकाला निविदेच्या कामाच्या एकुण मुल्याच्या **३% इतकी सुरक्षा अनामत** रक्कम म्हणुन संस्थानखाती जमा करावी लागेल. सदर रकमेस कोणतेही व्याज दिले जाणार नाही / मागणी करता येणार नाही.
४. पुर्ण माहीती भरलेली निविदा विहीत मुदतीत सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर राहील, मुदतीत प्राप्त न झालेल्या निविदा तसेच अपुर्ण निविदांचा विचार केला जाणार नाही / रद्द केल्या जातील.
५. एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे, त्याबाबत कारणे देणे संस्थान प्रशासनास बंधनकारक राहणार नाही.
६. सदर कामांबाबतची निविदा दि.   /    /२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि.   /   /२०२३ सायं.५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड व डाऊनलोंडीगसाठी उपलब्ध राहील.
७. ई-निविदा प्रक्रीयेमध्ये केवळ Online सादर करणेत आलेल्या कागदपत्रांचाच विचार करणेत येईल, त्यामुळे कागदपत्रांची Hard Copies संस्थानचे कार्यालयास जमा करणेत येणार नाहीत / स्विकारली जाणार नाहीत.
८. निविदाधारकांनी Online BOQ (**परिशिष्ट "ब"**) मध्ये दर नमुद करतांना GST वगळुन पुर्णांकीत दर नमुद करावेत.

(राहुल जाधव),
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

## निविदा भरतांना Technical Bid साठी ऑनलाईन सादर करावयाची कागदपत्रे

| | |
|---|---|
| १) अन्न औषध प्रशासन यांचेकडील अद्यायवत केटरींग परवाना. | |
| २) वैध लेबर लायसन्सची प्रमाणीत प्रत | |
| ३) सनदी लेखापाल यांचे सन २०१९-२०,२०२०-२१ व २०२१-२२ या मागील तीन वर्षाचे **परिशिष्ट "क"** प्रमाणे उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate with CA Approved) | |
| ४) पॅन कार्डची प्रमाणीत प्रत | |
| ५) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (Provident Fund) व ESIC योजना प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत | |
| ६) जी.एस.टी.(GST) प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत | |
| ७) कोणतेही संस्थान / शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था यांचे काळया यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र. | |
| ८) मागील ०३ वर्षाचे आयकर भरल्याचे दस्ताऐवज (Income Tax Returns of Previous 3 Years) | |

## - निविदाधारकाबाबत माहीती-

१. फर्मचे / संस्थेचे नांव ------------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता ------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

३. दुरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------------------------------

कार्यालय- ------------------------------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------------------------------

फॅक्स नंबर - ------------------------------------------------------------------------------------

ई- मेल- ----------------------------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव ------------------------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक ------------------------------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नांवे १ ---------------------------------------------------------------------------------

२ ---------------------------------------------------------------------------------

६. RTGS Details-

**१. बॅंक खाते नंबर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

२. बॅंकेचे नाव - -----------------------------------------------------------------

३. शाखा - -----------------------------------------------------------------

४. **IFSC CODE -** ५. MICR CODE -

***निविदाधारकाची सही व शिक्का***

## ***श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने द्यावयाचे बंधपत्र.***

---

दिनांक -

**प्रति,**

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ता.राहाता, जि.अहमदनगर

**विषय- श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता सन २०२३-२४ करीता दि.०१ ऑक्टोबर, २०२३ ते दि.३० सप्टेंबर, २०२४ या कालावधीकरीता उक्त्या मजुरी दराने मोतीचुर बुंदीचे लाडू, तयार करुन मागणीप्रमाणे पॅकींग करुन देणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणे इ. कामांची ई - निविदेबाबत...**

मा.महोदय,

मी / आम्ही खालील सही करणार लिहुन देतो / देते की, वरील विषयाबाबत आपण प्रसिध्द केलेल्या निविदेतील सर्व अटी - शर्ती मी / आम्ही वाचल्या असून, सर्व अटी-शर्ती मला / आम्हांला मान्य आहेत. आपले अटी - शर्तीचे पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे / आहोत.

मी / आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेप्रमाणे मोतीचुर बुंदी लाडु, सुट्टी बुंदी व बर्फी प्रसाद संस्थानव्दारा वेळोवेळी बदल करणेत येणा-या रेसीपीजनुसार उपरोक्त कालावधीत संस्थानचे आवश्यक्तेनुसार, कोणतीही कारणे न देता आवश्यकतेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांना बनवून व पॅकिंग करुन *(पॅकींग तारखेच्या शिक्क्यांसह)* देण्याची हमी देतो.

मी / आम्ही ई-निविदेची बयाणा रक्कम **रु.२,००,०००/-** (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) व निविदा शुल्क **रु.१५,०००/-** (अक्षरी - पंधरा हजार मात्र) शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जमा केली असल्याच्या पावत्या स्कॅन करुन निविदेसोबत जोडल्या आहेत.

माझी / आमची सादर केलेली उक्त्या दरांची निविदा मंजूर झाल्यास, एक महिन्यांचे आत योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देऊ व निविदा कामाच्या एकुण मुल्याच्या ३% सुरक्षा अनामत पुर्णाकिंत रकमेचा भरणा *(विनाव्याजी)* संस्थानच्या अधिकृत खात्यात अथवा प्रत्यक्ष लेखाशाखेत रोख स्वरुपात जमा करु. विषयांकीत काम **दि.०१ ऑक्टोबर, २०२३ ते दि.३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत** मंजूर दराने करुन देणे माझेवर / आमच्यावर बंधनकारक राहील, त्यात कसुर झाल्यास होणा-या शिक्षेस मी / आम्ही पात्र राहु असे बंधपत्र देत आहे / आहोत.

आपला / आपली विश्वासू,

फर्म मालक / भागीदारांचे नांवे — सही व शिक्का

(१)

(२)

# <u>परिशिष्ट-   "अ"</u>

---------------------------------------------------------------------------------------------------------------

## <u>कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम- १९५२ व ESIC योजनेसाठी करावयाची पुर्तता</u>

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आस्थापनेस कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ लागू असल्याने श्री साईबाबा संस्थान यांचेकडील कंत्राटदारांमार्फत नेमलेल्या कामगारांना देखील हा कायदा लागू होतो, त्यामुळे आपण कामाकरीता नेमलेल्या कामगारांचे पगारपत्रकानुसार होणारी भविष्य निर्वाह निधीची व ESIC योजनेची रक्कम दरमहा वेळेत भरणा करुन आवश्यक ती कागदपत्रे संस्थानचे भविष्य निर्वाह निधी कार्यासनाकडे जमा करणे ही कंत्राटदाराची कायदेशीर जबाबदारी आहे.

***कंत्राटदारास खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहतील.***

१) कामाचे सुरुवातीस कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम २१(१) नुसार मा.सहायक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडून या कामाकरीता घेतलेल्या लेबर लायसेन्सची प्रत अथवा त्याबाबतचे प्रतिज्ञापत्राची प्रत व संस्थान कामाकरीता घेतलेल्या लेबर लायसन्स मधील कर्मचारी संख्येपेक्षा कमी कर्मचारी कामास नेमलेले असतील तर प्रत्यक्षात किती कामगारांची नेमणुक केली आहे याबाबदचे दरमहा पत्र द्यावे लागेल.

२) आपण सदर कामाकरीता नेमलेल्या कर्मचा-यांचे भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाकडील विहीत नमुन्यातील वारसदार फॉर्म भरुन देऊन सदर फॉर्म भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करण्याची जबाबदारी आपली राहील.

३) दरमहा रक्कम भरणा केलेनंतर चलनाची एक मुळ प्रत ऑनलाईन प्रॉ.फंड रजिस्टर, रक्कम जमा केलेले रिमिटन्स स्लीप, हजेरी पत्रक व पगार पत्रक इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती (प्रत्येक महीन्याची स्वतंत्रपणे) संबंधीत विभागास सादर कराव्यात.

४) आपणास लाडू निर्मिती विभागाने काम दिलेले असल्याने त्याच्या अहवालावरुन कामाचा कालावधी निश्चीत करण्यात येईल व त्या कालावधीची उपरोक्त कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

५) प्रत्येक महीन्याचे बीलावर मागील महीन्यातील भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा केलेबाबत अभिप्राय देण्यात येतो, सदरची रक्कम भरणा करुन कागदपत्रे सादर केल्याशिवाय पी.एफ विभागास अभिप्राय देता येत नाही, त्यामुळे कागदपत्रे वेळेत सादर न केलेस आपले बील वेळेत अदा होत नाही.

६) उपरोक्तप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणेस कंत्राटदारास विलंब झाल्यामुळे सदर कामाचे बील प्रलंबीत राहीलेस त्याची सर्वस्वी जवाबदारी कंत्राटदारावर राहील.

७) संस्थानकडील कंत्राट संपलेनंतर आपलेकडील कामगारांची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम त्यांना परत मिळवून देणे संबंधीत कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

८) कंत्राटदाराने कामास लावलेल्या सर्व कर्मचा-यांचे राज्य विमा निगम (ESIC) योजनेबाबत रजिस्ट्रेशन करुन, कंत्राटी कर्मचारी हिस्सा ०.७५% व मालकाचा हिस्सा ३.२५% कामगारांचे खात्यावर भरणा करणे व आवश्यक कागदपत्रांची तपशिलवार माहीतीची पुर्तता करुन देणे इ. कंत्राटदारांस बंधनकारक राहील.

# <u>परिशिष्ट - "ब"</u> <u>(BOQ - I)</u>

**दिनांक ------------------**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने भरुन द्यावयाचे दरपत्रक**
**कंत्राटाचा कालावधी - दि.०१ ऑक्टोबर, २०२३ ते दि.३० सप्टेंबर, २०२४**

१. गावरान तुपातील अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे मोतीचुर बुंदीचे लाडू तयार करुन सुकविणे व मागणीप्रमाणे पाकीटे / बॉक्स पॅकींग करणे (उदा.०१ नगाचे, ०३ नगाचे व इतर पॅकींग) इ.चा प्रती १००० लाडू नगास -

दर रु.----------------------- (अक्षरी रुपये --------------------------------------------------------------------------)

२. वनस्पती तुपातील बर्फी तयार करणे. (**प्रती ०१ क्विंटल** साखरेसाठी) -

दर रु. --------------------- (अक्षरी रुपये --------------------------------------------------------------------------)

- **टिप - उपरोक्त नमुद केलेले सर्व दर GST सोडुन / वगळुन नमुद करावेत.**
  **Note - All Above mentioned rates should be excludable of GST**

*फर्म/ संस्थेचा सही व शिक्का*

## परिशिष्ट - "क"

## <u>वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र</u>

*(अधिकृत सनदी लेखापाल यांचे लेटरहेडवर)*

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायांची <u>सन २०१९-२०, २०२०- २१ व २०२१-२२</u> या आर्थिक वर्षाची वार्षिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **वर्ष** | **वार्षिक उलाढाल** (रुपयांत) |
|---|---|---|
| ०१ | सन २०१९-२० | |
| ०२ | सन २०२०-२१ | |
| ०३ | सन २०२१-२२ | |
| **सरासरी वार्षिक उलाढाल (Average)** | | |

**दिनांक :-** / /२०२३

**ठिकाण -**

**सनदी लेखापाल**

***(Chartered Accountant)***

*( नाव / सही व शिक्का )*

नोंदणी क्रमांक -

# <u>अनुक्रमणिका</u>


| अ.नं. | तपशिल | पान नं. |
|---|---|---|
| ०१ | वृत्तपत्रात द्यावयाचा ई  निविदा -मसुदा | ०२ |
| ०२ | प्रस्तावना व कामाचे स्वरुप | ०३ |
| ०३ | लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद तयार करणा-या ठेकेदाराने पाळावयाचे नियम | ०४-०५ |
| ०४ | निविदेच्या अटी व शर्ती | ०६-११ |
| ०५ | निविदाधारकांसाठी सूचना | १२ |
| ०६ | ऑनलाईन सादर करावयाची कागदपत्रे | १३ |
| ०७ | निविदाधारकाबाबत माहीती व बॅंक तपशिल | १४ |
| ०८ | निविदाधारकाने संस्थानला द्यावयाचे बंधपत्र | १५ |
| ०९ | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व ESIC योजनेबाबत पुर्तता (परिशिष्ट अ) | १६ |
| १० | निविदाधारकाने भरुन द्यावयाचे दरपत्रक (BOQ A & B) | १७ |
| ११ | वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र (परिशिष्ट क ) | १८ |